# मानवाधिकार व भारत

*डॉ. सर्जेराव शिंदे

सुप्रसिध्द विचारवंत जीन जैक्स रुसो ने जवळपास २०० वर्षापुर्वी लिहिले होते, "मनुष्य स्वंतत्र अवस्थेत जन्मला आहे. परंतु तो अनेक ठिकाणी बंधनात अडकला आहे." या विचारात रुसोने शोषण तसेच असमानतेच्या बंधनात अडकलेल्या जनसाधारणाच्या स्वंतत्र होण्याच्या स्वाधीनता, स्वातंत्र्य तसेच समानतेचे चांगले जीवन प्राप्त करण्याची आंकाक्षा व्यक्त केली होती. मानवाधिकाराची कोणतीही सर्व मान्य व्याख्या नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरच्या प्रस्तावनेत मानवाच्या मूलभूत अधिकाराविषयी विश्वास आवश्य प्रतिपादन केले आहे. परंतु चार्टर मध्ये मानवाधिकाराची व्याख्या स्पष्ट केली नाही. तसेच मानवाधिकाराला सूचीबध्द केले नाही. "मानवी अधिकार असे अधिकार आहे जे प्रत्येक मनुष्यास मनुष्य होण्यासाठी आवश्यक आहे. याच्यासाठी कायदेशीर व्यवस्था केली असू अगर केली नसू."(१) यावरुन हे जाहिर आहे की, मानव अधिकाराच्या विचारांचे क्षेत्र नागरीक अधिकाराच्या तुलनेत अत्यंत विस्तृत आहेत.सामान्य अर्थाने मानवाधिकाराचे तात्पर्य आहे. मानव जरी कोणाही लिंग, वर्ग किंवा जातीचे असो, कोणताही देश,प्रदेश, तसेच कोणत्याही क्षेत्रात राहत असू, कोणत्याही धर्म, संप्रदाय किंवा मत मानणारा असू गरीब असो की श्रीमंत, सर्वांना आपला विश्वास, सरंक्षण आणि सन्मान जनक जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार जन्माबरोबरच प्राप्त आहेत.(२)

आमची नैतिक चेतना आणि सामाजिक चेतना जितकी विकसीत होत जाईल, मानवी अधिकाराचे विवेक क्षेत्र ही तितकेच विस्तृत होत जाईल. परंतु यातील कांहीच क्षेत्र जगातील काही भागात कायद्याद्वारे सुरक्षित केले जाऊ शकेल. केवळ व्याच अधिकारांना नागरिक अधिकाराच्या रुपात मान्यता मिळेल, ज्या समाजात जितके जास्त मानव अधिकारांना नागरिक अधिकाराच्या रुपात स्थापित केले जाईल. तो समाज नैतिक दृष्टीने तितकाच प्रगतीशीर मानला जाईल. मानवी अधिकारी या शब्दाचा प्रयोग २० व्या शतकातच सुरु झाला आहे. काही ठिकाणी यास लोकतंत्रीय अधिकार म्हटले जाते.परंतु 'मानव अधिकार' हाच शब्द प्रचलित आहे.लोकतंत्रिय अधिकार हे याचे एक महत्वपूर्ण अंग आहे हे निश्चित. मानव अधिकार असे अधिकार आहेत जे प्रत्येक मानवास प्रत्येक वेळी तसेच ठिकाणावर या कारणाने प्राप्त आहे की ते इतर प्राण्यांच्या पेक्षा अधिक विवेकशील, तर्कसंगत तसेच नैतिक आहे. लोकतंत्र पध्दतीच्या उदयानंतर मानवाला हक्क प्राप्त होण्याची चिन्हे दिसू लागली. सुखी, आनंदी, निर्भय आणि भयमुक्त जीवन मानवास प्राप्त होणे आवश्यक आहे. द्वितीय महायुद्धाच्या विनाशकारी परिणामामुळे सुखी तसेच भयभीत जगाने संयुक्त राष्ट्राच्या माध्यमाने मानवाधिकारा प्रती निष्ठेचा संकल्प केला. या संकल्पनेत हा विचार सहभागी आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघ व मानव अधिकार** :-संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टर मध्ये मानव अधिकारासंबंधी वेगळी अशी कोणतीही घोषणा सहभागी नव्हती. परंतु चार्टर मध्ये अनेक ठिकाणी याचा स्पष्ट उल्लेख केला गेला होता. मानव अधिकारासंबंधी राज्यामध्ये सहकार्य स्थापन करणे. तसेच संयुक्त राष्ट्राच्या चार्टर उद्देशास क्रियान्वित करण्यासाठी आवश्यक मानले गेले. संयुक्त राष्ट्र संघाच्या चार्टर मध्ये मानव अधिकारासंबंधी पुढील संदर्भ मिळतात. १. चार्टर प्रस्तावनेत, मानवाच्या मुलभूत अधिकार, मानवाच्या व्यक्तीत्वाचे गौरव तसेच महत्वामध्ये पुरुष व स्त्रियांना समान अधिकारासंबंधी विश्वास प्रकट केला आहे.(३) २. कलम १ नुसार चार्टरचे वर्णन पुढील पध्दतीने केले आहे. "मानव अधिकाराच्या प्रती सन्मान वाढविणे, तसेच जात, लिंग, धर्म, भाषा या व्यतिरिक्त मुलभूत अधिकारास प्रोत्साहन देणे."(४) ३. कलम १३ नुसार "जात, लिंग, धर्म, भाषा यांच्या भेदभावा व्यतिरिक्त सर्व मानव अधिकार तसेच मुलभूत स्वांतत्र्यास प्रोत्साहन देणे."(५) ४. कलम ५५ नुसार "जात, लिंग, धर्म, भाषा यांच्या भेदभावा व्यतिरिक्त सर्वासाठी मानव अधिकार तसेच मूलभू स्वांतत्र्यास प्रोत्साहन देणे."(६) ५. कलम ५६ नुसार "सर्व सदस्य राज्य मानव अधिकार तसेच मानवी स्वांतत्र्य प्राप्तीसाठी संयुक्त राष्ट्र संघास सहकार्य करणे."(७) ६. कलम ६२ नुसार "आर्थिक आणि सामाजिक परिषदेतील सर्वासाठी मानव अधिकार तसेच मूलभूत स्वातंत्र्या प्रती सन्मानाची भावना वाढविणे तसेच त्यांच्या पालनासाठी शिफारस करणे." याची व्यवस्था आहे.(८)

**मानवाधिकार व भारत** :- भारताने स्वातंत्र्यानंतर जागतिक स्तरावर मानव अधिकाराच्या संरक्षणासाठी प्रभावशाली प्रयत्न केले आहेत. वास्तविक भारतीय राज्यघटनेत मानव अधिकारास संकल्पीत करीत त्यांच्या प्रती संवेदनशील बनण्याचा प्रयत्न केला आहे. याच प्रकारे भारताने अमेरिकन राज्यघटनेकडून मुलभूत अधिकारांचा व आर्यलैंन्डकडून मार्गदर्शक तत्वांचा स्विकार केला आहे. मानवअधिकाराचे सर्वभौम भारताने मूलभूत अधिकारात समावेश केला आहे. त्याचप्रमाणे भारताने या अधिकारांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र, न्यायपालिकेची निर्मिती केली आहे. भारतीय राज्यघटनेत १९७६ ला राज्यघटनेच्या ४२ व्या घटनादुरुस्ती नंतर मार्गदर्शक तत्वे व मूलभूत अधिकारांच्या स्वरुपात व्यापक परिवर्तन झाली. यामुळे न्यायपालिकेने सामाजिक, आर्थिक अधिकारांच्या संरक्षणासाठी सरकारवर अनेक वेळा दबाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. भारताचा प्राचीन इतिहास पहिल्यास असे दिसून येते की, पूर्वीपासूनच भारतात मानवी अधिकाराची संकल्पना अस्तित्वात

* राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संभाजी महाविद्यालय, मुरुड, लातूर

होती. प्राचीन भारताच्या सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, समाज कर्मावर आधारीत होता तसेच व्यक्ती व समाज या दोन्हीचे एकमेकांप्रती दायित्व होते. ज्याचे निर्वाहन करणे आवश्यक होते. वास्तविक समाजात धर्म तसेच धार्मिक कार्य व संकल्पनांचे वर्चस्व होते. वैदिक संस्कृतीत स्वधर्म उल्लेख हा अधिकारा संबंधीत केला होता. स्वधर्मो अनुष्ठितः श्रेत्रान पर धर्मो भयावहः इति ।[९] आजच्या कल्याणकारी राज्याच्या संदर्भात राज्य स्थापनेच्या संकल्पनेचा विचार करता राज्याचे दायित्व हे नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करणे व अनेक राजकीय, सामाजिक, आर्थिक न्यायाचे सुनिश्चितीकरण करणे हे आहे. यासाठी अनेक विद्वानांची मदत घेतली जाते. वास्तविक प्रत्येकाने आपल्या कर्तव्याचे पालन करणे म्हणजे धर्म होय. भारतात सामाजिक व आर्थिक अधिकारापासून वंचित राहिलेले लोक, महिला, अपंग, वृध्द,लहान बालके तसचे मागास वर्गासाठी समतेच्या सिध्दांतावर आधारीत त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी वेळोवेळी अनेक कायदे करण्यात आले आहेत. ६५ व्या घटना दुरुस्तीनुसार देशातील अनुसूचित जाती, जमातीतील लोकांच्या कल्याणासाठी व संरक्षणासाठी व सरकारला आवश्यक तो सल्ला देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना केली आहे. अशाच प्रकारे घटनेच्या कलम १५(४) नुसार केले गेलेल्या व्यवस्थेनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या १६ नोव्हेंबर १९९३ च्या मंडळ आयोगाच्या निर्णयात मागास वर्गाचे हित व संरक्षणासाठी व तसेच त्यांना सुरक्षा व न्याय देण्यासाठी ऑगस्ट १९९३ ला राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाची निर्मिती केली गेली.[१०] अशाच प्रकारे महिलांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी १९९२ ला राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. अल्पसंख्याकांच्या कल्याण व संरक्षणासाठी १९७८ ला अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करण्यात आली व याचे अधिकार क्षेत्र १९९२ ला राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची पुर्नस्थापना करीत देशातील सर्व अल्पसंख्यांकाच्या सुरक्षेसाठी सुनिश्चित प्रयत्न केले गेले.

**राष्ट्रीय मानव अधिकार आयोग** :-२८ सप्टेंबर १९९३ च्या प्रभावी मानव अधिकाराच्या संरक्षण कायदा १९९३ च्या कलम ३ नुसार राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाचे अध्यक्ष हा सर्वोच्च न्यायालयाचा भूतपूर्व न्यायाधिश असतो. या आयोगाचे सदस्य हे सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश, उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधिश, मानव अधिकारासंबंधी विशेष ज्ञान असणारे दोन सदस्य , तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्ष हे सदस्य राहतात.

**राज्य मानव अधिकार आयोग** :- मानव अधिकार संरक्षण कायदा २१ नुसार प्रत्येक राज्यात राज्य स्तरावर राज्य मानव अधिकाराची स्थापना केली. या आयोगाचे अध्यक्ष हे कोणत्याही उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश राहिलेले असतात. एक सदस्य उच्च न्यायालयाचा न्यायाधिश, एक सदस्य जिल्हा न्यायाधिश व मानवाधिकारासंबंधी ज्ञान असलेले दोन सदस्य असतात.

**मानव अधिकार न्यायालय** :- मानव अधिकारासंबंधी उल्लंघन होणा-या अपराधांची लवकर सुनावणीसाठी राज्य सरकार, उच्च न्यायालय, मुख्य न्यायाधिशानुसार प्रत्येक जिल्ह्यात अपराध्यांच्या सुनावणीसाठी मानव अधिकार न्यायालयाची स्थापना केली आहे.भारतात स्वातंत्र्या नंतर मानव अधिकारांवर जितके प्रहार झाले तितके कोणतेच इतके घ्रणास्पद नाहीत जितके अतिरेक्यांनी योजना बध्द रितीने केलेल्या आहेत. हिंसेच्या कृत्यामुळे जम्मू-काश्मीर मध्ये अतिरेकी कारवाईने ३०,००० काश्मीर पंडितांना काश्मीर घाटीतून जावे लागले.[११]

**भारताने मानव अधिकाराच्या दृष्टीने दिलेले योगदान खालील प्रमाणे सांगता येतील.**

१.भारताने संयुक्त राष्ट्र मानव अधिकार, आर्थिक, सामाजिक, आणि महासभेच्या अधिवेशनात मानव - अधिकारांच्या मुद्यांवर सक्रीय स्वरुपात सहभाग घेतला. २. भारत १६ आंतरराष्ट्रीय करारात सहभागी आहे. यास संयुक्त राष्ट्र संघाच्या तत्वांच्या विचारात तयार केले आहे. त्यातील प्रमुख आहेत.:-आंतरराष्ट्रीय,आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतीक अधिकार प्रसंविदा, आंतरराष्ट्रीय विविध तसेच राजकीय अधिकार प्रसंविदा, लहान बालकसंबंधीत कायदे. ३. भारतातील प्रमुख व्यक्ती मानव अधिकारांच्या समित्यांवर महत्वपूर्ण सदस्यांच्या रुपात उल्लेखनीय कार्य करत राहिले आहेत. यात पी.एन.भगवती ज्यांचा मानव अधिकार संबंधीत सहमतीने समावेश राहिला आहे. जातीय भेदभाव नष्ट करण्यासाठी असलेल्या समितीने श्रीमती शांती सादिक अली, निरंकुश नजरबंदी कार्यकारी दलामध्ये कपिल सिब्बल यांची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. ४. भारतीय संसदेने राष्ट्रीय मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ अनुसार राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना केली. त्याचे अध्यक्ष हे सर्वोच्च न्यायालयाचे उच्च न्यायाधिश राहिलेले असतात. ५. राज्य मानव अधिकारांची स्थापना केली. ६. जलद गतीने निकाल लागावा म्हणून मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ च्या ३० व्या कलमात राज्य न्यायालय स्थापन करण्याची संकल्पना मांडली. या नुसार अनेक राज्यांनी या न्यायालयाची स्थापना केली. मानवाधिकारासंबंधी विचार करता असे दिसून येते की, जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्रसंघाने आपली भूमिका अत्यंत योजनाबध्द रितीने मांडली आहे. भारताच्या संदर्भात विचार करता भारताने आपले पूर्वीपासून आसलेल्या विचारात भर टाकत अतिशय महत्वाची भूमिका बजावली आहे. हे वरील विश्लेषणातून दिसून येते. या विचारातून भारताने जागतिक क्षेत्रातील समतेच्या तत्वाचे प्रतिपादन होत असलेले दिसून येते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. गाबा ओम् प्रकाश - राजनीती विज्ञान विश्वकोष पृ.क्र. १०८-१०९ २. ओझा. एन.एन.- भारत एवं विश्व आंतरराष्ट्रीय मुद्दे एवं आंतरराष्ट्रीय संस्थाएं पृ.क्र. ३ ३. डॉ. फडिया बी. एल. - आंतरराष्ट्रीय राजनीती पृ.क्र. ३०३ ४. कित्ता - पृ.क्र. ३०३ ५. कित्ता- पृ.क्र. ३०३ ६. कित्ता- पृ.क्र. ३०३ ७. कित्ता- पृ.क्र. ३०३ ८. कित्ता- पृ.क्र. ३०३ ९. ओझा. एन.एन.- भारत एवं विश्व आंतरराष्ट्रीय मुद्दे एवं आंतरराष्ट्रीय संस्थाएं पृ.क्र. १७ १०. कित्ता-पृ.क्र. १८ ११. डॉ. फडिया बी. एल.-आंतरराष्ट्रीय राजनीती पृ.क्र. ३१२